साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2570, 15 जून, 2026, वर्ष 2, अंक 4 (संशोधित) 2017 पासून निरंतर प्रकाशित

रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026 प्रति अंक शुल्क ₹ 0.00

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

वार्षिक सदस्यता शुल्क ₹ 100.00; (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

## धम्मवाणी

**हंसादिच्चपथे यन्ति, आकासे यन्ति इद्धिया।**
**नीयन्ति धीरा लोकम्हा, जेत्वा मारं सवाहिनिं॥**

*— धम्मपदपालि- 175, लोकवग्गो*

हंस सूर्य-पथा (आकाशा) त जातात, (कोणी) ऋद्धी-बळाने आकाशात जातात. पंडित लोक सेनेसहित माराला जिंकून (या) लोकातून (निर्वाणाला) नेले जातात (अर्थात, निर्वाण प्राप्त करून घेतात.).

## बुद्ध-स्थळांची धर्म यात्रा

पूज्य गुरुजी आणि पूज्य माताजींनी जुन्या साधकांचा आग्रह स्वीकारून 14 दिवसांच्या धर्मयात्रेत सामिल होण्याचा निर्णय घेतला की जी सन 2001 मध्ये 17 फेब्रुवारी ते 2 मार्चपर्यंत संपन्न झाली. चालत्या ट्रेनमध्ये सामूहिक साधना होत असत, गुरुजींची धर्मवाणी गुंजत असे आणि त्यांचे निर्देश (स्पीकर्सद्वारे) सर्व साधकांना प्रत्येक डब्यात स्पष्ट ऐकू असत. ट्रेन, बस आणि चारचाकी वाहनांचा काफिला भगवान बुद्धांच्या तीर्थ-स्थळांवर साधना करत चालत राहिला. या यात्रेच्या दरम्यान धम्मविमुत्ति, कुशीनगर येथे 27 फेब्रुवारीला त्यांनी जे प्रवचन दिले, ते एप्रिल आणि मे 2017 च्या 'विपश्यना' पत्रिकेत दोन अंकात प्रकाशित झाले होते. आता यांना थोडे संपादित करून एकत्र प्रकाशित करत आहोत. (सं.)

माझ्या प्रिय विपश्यी साधक-साधिकांनो!

आज आपण एका अशा महत्वपूर्ण स्थानावर एकत्र झालो आहोत, जिथे एका महापुरुषाची खूप लांबवरची दीर्घयात्रा पूर्ण झाली. अगणित कल्पांपूर्वी हा व्यक्ती ब्राह्मण सुमेधच्या नावाने एक तपस्वी होता आणि त्या वेळी संसारात दीपंकर नावाचे सम्यक संबुद्ध उत्पन्न झाले होते. हा व्यक्ती त्यांच्या संपर्कात आला तेव्हा याच्या मनात खूप मोठा धर्म-संवेग जागला—"मीही अशाच प्रकारे सम्यक संबुद्ध बनलो तर माझ्याद्वारे कित्येकांचे कल्याण होईल." या धर्म-संवेगाच्या आधारावर तो आपली धर्म कामना दीपंकर सम्यक संबुद्धाच्या समोर प्रकट करतो.

अनेक लोक असे असतात, जे कोणा सम्यक संबुद्धांना पाहून मनात असे भाव जागवतात की हा व्यक्ती संसाराचे इतके कल्याण करत आहे, मी देखील या अवस्थेला पोहोचून संसाराचे कल्याण करू शकेन. सम्यक संबुद्ध तपासून पाहतात की हा व्यक्ती खरोखर या लायक आहे की नाही? अजून लायक नसेल तर केवळ स्मित करून राहतात. आणि लायक असेल तर याच्यात लोक-सेवेचा जो भाव जागला आहे, त्यात दृढताही आहे काय? की या वेळेच्या परिस्थितीमध्ये आत्ता जागला आणि उद्या समाप्त होऊन जाईल?

दुसरी गोष्ट ही पाहतात की याच्यात क्षमता किती आहे? काय पूर्वीच्या अनेक जन्मांमध्ये याने आपल्या पारमिता पूर्ण केल्या आहेत? जर हो, तर किती? जर त्याने इतक्या पारमिता पूर्ण केल्या आहेत की सम्यक संबुद्ध त्याला विपश्यना शिकवतील तर साधना करत-करत तो भवमुक्त होईल, अरहंत होईल? त्याचे भविष्य पाहतात- होय, हा व्यक्ती या लायक आहे की आजही मुक्त होऊ शकतो आणि तरीही तो इच्छित आहे की मी सम्यक संबुद्ध बनेन; हे समजत असूनही की सम्यक संबुद्ध बनण्यात त्याच पारमिता कितीतरी मोठ्या मात्रेत गोळा कराव्या लागतात, अगणित जन्मांपर्यंत काम करावे लागते, इतका वेळ लागतो! काय या व्यक्तीमध्ये खरोखर त्यागाची ही भावना आहे?

हा व्यक्ती स्वतः देखील समजत आहे की मी याच वेळी यांच्या शिकवणीने मुक्त अवस्था प्राप्त करू शकतो. परंतु हाती आलेल्या त्या मुक्तीला त्यागतो. माझ्या एकट्याच्या मुक्त होण्याने काय होईल? जसे यांनी बोधीसत्वाच्या रूपात आपल्या अनेक जन्मांमध्ये लोक-कल्याण केले आणि आपल्या पारमिता वाढवित गेले तसे मीही अनेक जन्मांमध्ये भले कितीही कष्ट झेलावे लागले तरी, पारमितांना वाढवत-वाढवत त्या अवस्थेपर्यंत पोहोचेन जिथे मी सम्यक संबुद्ध बनेन.

आणखी एक बलिदानाची ही भावना—हातात आलेल्या मुक्तीला त्यागतो, दुसरीकडे अनेक प्राण्यांच्या भल्यासाठी अनेक जन्मांचे कष्ट सहन करण्यासाठी तयार आहे. ते पाहतात खरोखर हा व्यक्ती या लायक आहे, तेव्हा त्याचे भविष्य पाहत आशिर्वाद देतात की चार असंख्य एक लाख कल्पांच्या नंतर तू कपिलवस्तुमधील शुद्धोधनाच्या घरी, महामायेच्या पोटी जन्म घेशील आणि त्यावेळी सम्यक संबुद्ध होशील. तेव्हापासून हा व्यक्ती जन्मावर जन्म घेत चालला आहे, कधी या योनीत, कधी त्या योनीत. भिन्न-भिन्न योनींच्या त्या प्राण्यांना धर्माकडे उन्मुख करण्यासाठी, त्यांच्यात धर्माची चेतना जागवण्यासाठी आणि आपल्या पारमितांना आणखी अधिक पुष्ट करण्यासाठी, किती काळ लागला? मोजताच येत नाही!! इतक्या कालावधीनंतर सिद्धार्थ गौतमच्या नावाने जन्म झाला आणि शरीरावरील लक्षणे पाहणाऱ्यांनी सांगितले की हा व्यक्ती घरात राहिला तर चक्रवर्ती सम्राट होईल, घर सोडले तर सम्यक संबुद्ध होईल. त्याला चक्रवर्ती सम्राट नाही, सम्यक संबुद्ध बनायचे होते; सम्यक संबुद्ध बनला.

"बोधगया" मध्ये बोधीवृक्षाखाली त्यांना सम्यक संबोधी प्राप्त झाली, मुक्त अवस्था प्राप्त झाली. 29 वर्षांच्या वयात घर सोडले होते, 35 वर्षांच्या अवस्थेत सम्यक संबुद्ध बनले. त्यानंतरची 45 वर्षे, रात्रंदिवस लोक-सेवाच लोक-सेवा. रात्री केवळ एक प्रहर (साधारण 3 तासांचा वेळ) आराम करीत असत- सजग, संप्रज्ञानी राहून. बाकी वेळ लोक-सेवाच लोक-सेवा. इतक्या साऱ्या करुणेच्या बळावर लोक-सेवा करता करता याच स्थानी त्यांची शरीरच्युती झाली, ज्याला "महापरिनिर्वाण" म्हटले गेले.

निर्वाण म्हणतात, त्या अवस्थेला जिथे इंद्रिये काम करणे बंद करतात. विपश्यना करत-करत, मनाचे विकार निघता-निघता ती अवस्था येते जेव्हा

रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026

अधोगतीकडे जाणारे सारे कर्म-संस्कार समाप्त होऊन जातात, तेव्हा पहिल्यांदा निर्वाणिक अवस्थेचा साक्षात्कार होतो आणि तेव्हा तो व्यक्ती “श्रोतापन्न” म्हटला जातो. आता त्याच्यासाठी अधोगतीची दारे बंद झाली. तो जास्तीत जास्त सात वेळा जन्म घेईल त्यापेक्षा अधिक नाही, त्याहून भले कमी असतील. आणखी पुढे जातो तेव्हा “सकदागामी” होतो. आता तो केवळ एकदाच जन्म घेईल या काम-लोकात, म्हणजे, मनुष्य लोकात किंवा देव लोकात. “अनागामी” झाला तर केवळ ब्रह्म-लोकात जन्म घेईल. त्याच्या पुढची डुबकी लागली तर “अरहंत” होऊन साऱ्या लोकांपासून मुक्त होऊन जातो.

जेव्हा सम्यक संबुद्ध बनतो तेव्हा या चारही अवस्था एकामागोमाग एक प्राप्त होतात. सम्यक संबुद्ध झाला, तर निर्वाण मिळाले, पूर्णपणे मुक्त झाला. त्याला “सउपधिसेस निर्वाण” म्हणतात, अजून उपधि आहे, म्हणजे या जन्माला पुढे वाढवणारे असे कर्म-संस्कार राहिले नाहीत जे नवीन जन्म देऊ शकतील परंतु या जन्मात, या शरीराचे ओझे वाहण्यासाठी अजून “सउपधि” आहे. आणि जेव्हा अशा व्यक्तीची, अशा महापुरुषाची, अशा अर्हंताची शरीर-च्युती होते तेव्हा त्यानंतर त्याचा कोणता जन्म होत नाही. म्हणजे अनुपधिसेस- आता कोणती उपधि नाही, कोणता जन्म नाही. “परिनिर्वाण”- निर्वाण परिपूर्ण झाले. अशा महापुरुषाचे “महापरिनिर्वाण” याच स्थानावर झाले.

त्या व्यक्तीत किती करुणा आहे! साऱ्या जन्मांमध्ये करुणाच करुणा, करुणाच करुणा. तेव्हाच तर लोक-सेवा करेल; नाही तर तो कशी करेल? आणि या जीवनातही करुणाच करुणा, करुणाच करुणा. महापरिनिर्वाणाची वेळ जवळ येत चालली आहे. तीन महिन्यांपूर्वी ही घोषणा केली, जेव्हाकी ते वैशालीमध्ये होते— “येणाऱ्या 'वैशाख पौर्णिमेला', म्हणजे, तीन महिन्यांच्या नंतर या शरीराची च्युती होईल.” तिथून चालत-चालत इथपर्यंत आले. रस्त्यात एक दिवस आधी “चुंद” नावाच्या गृहस्थाने त्यांना भोजन-दान दिले, जे कुकुरमुत्ता (एक प्रकारच्या जंगली मशरूम) चे होते, जे विषारी असतात. त्यांनी स्वतः तर खाल्ले पण इतर भिक्षूंना देण्यापासून रोखले आणि म्हटले, याला कोणी खाऊ नये. त्यांचे तर “परिनिर्वाण” होणारच होते. परंतु करुणा जागते त्या चुंदवर; अरे, माझ्यानंतर लोकांनी चुंदला काही वाईट बोलू नये— अरे, चुंद! तू कसा वेडा आहेस! तू असे भोजन दिलेस की भगवानांचे शरीर सुटले- कुठे लोकांनी असे म्हणू नये म्हणून आनंदला म्हणतात, “माझ्यानंतर तू जाऊन सांग त्या चुंदला की तू खूप मोठे पुण्याचे काम केलेस. सम्यक संबुद्ध बनण्यापूर्वीचे जे भोजन असते, खूप पुण्यशाली असते; जसे सुजाताने त्यांना खीर खायला दिली, आणि जे अंतिम भोजन असते तेही तितकेच पुण्यशाली असते. इतक्या जन्मांपर्यंत भव-संसरण करत-करत आता हे भव-चक्र समाप्त होईल, तेव्हा खूप पुण्य आहे. त्याच्या मनावर कुठे आघात होऊ नये. लोकांनीही त्याच्याविषयी असे काही बोलू नये.” किती करुणा आहे! किती करुणा आहे!

इथे एका जुळया शाल वृक्षाखाली थांबून म्हटले, बस! इथेच मी पहुडतो. आनंद! सकाळ होता-होता प्राण जातील, महापरिनिर्वाण होईल. आजूबाजूला मल्लांचे गणराज्य, त्यांना जेव्हा माहीत होईल की भगवान आमच्या गणराज्याच्या इतक्या जवळ आले आणि इथे त्यांचे शरीर सुटले, येऊन ते अंतिम वेळी दर्शन करतील. जर त्यांना ही संधीच नाही मिळाली तर तुला ते लांछित करतील. तू जा! त्यांना कळवून दे. आनंद गेला, साऱ्या नगरात कळवले- उद्या सकाळ होता-होता भगवान बुद्ध “महापरिनिर्वाणा” ला प्राप्त होतील.

लोक तिथे येऊ लागले. इतके लोक येत आहेत नमस्कार करण्यासाठी. आनंदने इतकी मोठी गर्दी पाहिली तेव्हा म्हटले भाऊ! काही लोकांनी एकत्र जाऊन, बस, नमस्कार करा आणि निघून जा! वेळ कुठे आहे? नमस्कार करा आणि निघून जा! या गर्दीत “सुभद्र” नावाचा एक व्यक्ती येतो. तो म्हणतो की मी केवळ नमस्कार करण्यासाठी नाही आलो, मला तर त्यांच्याकडून विद्या शिकायची आहे. त्यांच्यानंतर न जाणे तुम्ही लोक योग्य प्रकारे समजावू शकाल की नाही; आनंद म्हणतो की तू वेडा झाला आहेस, आता त्यांची शरीर सोडण्याची वेळ झाली आहे, अशा वेळी तू त्यांना त्रास देऊ नकोस, त्यांना निश्चिंतपणे प्राण सोडू दे. तो म्हणतो नाही, मला तर त्यांच्याकडून धर्म शिकायचा आहे. हा म्हणतो- नाही, तुला नमस्कार करायचा असेल तर कर नाही तर बाजूला हो, इतरांना पुढे येऊ देत. हे शब्द भगवानांच्या कानावर पडतात. कोणी तहानलेला व्यक्ती गंगेच्या जवळ येईल आणि दुसरा त्याचा हात पकडेल, पाणी पिऊ नकोस, गंगेला नमस्कार करून निघून जा, तेव्हा गंगेला पूर येतो- अरे, आनंद! येऊ दे. हा योग्य पात्र आहे. याला मला धर्म शिकवू दे, आणि सुभद्रला धर्म शिकवतात. जो व्यक्ती आपले शरीर सोडता-सोडता इतक्या करुणेने भरलेला आहे- अरे, एका व्यक्तीचे तर कल्याण व्हावे! याचे कल्याण होऊ दे! हे लक्षण आहे महापुरुषाचे; इतक्या करुणेने भरलेले असतात.

या स्थानावर आणखीही महत्वपूर्ण घटना घडल्या. एक मोठी महत्वपूर्ण घटना घडली- कोणीतरी विचारले, “महाराज! आपण गेल्यानंतर आपला उत्तराधिकारी कोण असेल?” उत्तराधिकारी आणखी कोण असेल रे? उत्तराधिकारी धर्म असेल. जो धर्म मी शिकवला आहे, तोच तुमचा आचार्य असेल, गुरु असेल. कोणा एका व्यक्तीला उत्तराधिकारी बनवले तर पंडेगिरी सुरु होईल, पुरोहितगिरी सुरु होईल. व्यक्ती जर त्या उच्च अवस्थेपर्यंत पोहोचला नसेल तर एक नशा असते की जसे लोक भगवान बुद्धांचा सन्मान करतात, तसा माझाही झाला पाहिजे- ही नशा धर्माला घेऊन बुडते. म्हणून धर्मच उत्तराधिकारी आहे. धर्माचे जो पालन करेल, तो आपले कल्याण करून घेईल.

एक आणखी महत्वपूर्ण घटना घडली, त्यांचे “महापरिनिर्वाण” झाले तेव्हा त्यांचे प्रमुख शिष्य “महाकाश्यप” अजून थोडे दूर आहेत, सात दिवसांची यात्रा करतील तेव्हा पोहोचतील. ते येईपर्यंत त्यांच्या शरीराची दाह क्रिया केली गेली नाही. काश्यप आपल्या 500 भिक्षूंसहित चालत येत आहेत. त्यांच्यात “सुभद्र” नावाचा नवीन-नवीन भिक्षू, खूप वृद्ध, जास्त वयाचा पण धर्मात खूप कच्चा, तो खूप खुश होतो – चांगले झाले तो वृद्ध मरण पावला. नाकात दम आणला होता- असे करा, असे करू नका.. आता तो निघून गेला, आम्हाला सूट आहे, आम्ही जे हवे ते करू. काश्यपने पाहिले- भले, सारा संघ खूप पक्व झालेला आहे, पण संघात असे वेडे लोकही आहेत की भगवानांनी जे म्हटलेले नाही तेही त्यांच्या मुखात टाकून देतील, भगवानांनी असे म्हटले, असे म्हटले... आणि जे म्हटले आहे, ते त्यांच्या अनुकूल नसेल तर त्याला काढून टाकतील. तेव्हा असे लोक धर्माला नष्ट करून टाकतील. तेव्हा काय केले पाहिजे? म्हणून भगवानांची जितकी वाणी आहे, ती सर्व संगृहीत केली जावी.

सात दिवसांनंतर जेव्हा दाहकर्म पूर्ण झाले, त्याच्या तीन महिन्यांनंतर, जिथे आपण राजगीरला गेलो होतो, तिथे वर त्या “सप्तपर्णी गुहेत” पहिले संगायन झाले. 500 अशा भिक्षूंनी जे बुद्धांच्या खूप निकट होते आणि अरहंत होते, त्यांनी एकत्र बसून बुद्ध-वाणीचे संगायन केले. बुद्धांनी असे म्हटले, असे म्हटले...; सर्वजण म्हणतील- हो, असेच म्हटले... विनयाचे शिक्षण, म्हणजे, भिक्षूंच्या नियमांचे जे शिक्षण होते; त्याला “उपाली”, जे भिक्षूंचे मोठे आचार्य होते, आणि भिक्षूंच्या नियमांचे खूप जाणकार होते, त्यांनी त्याचा पाठ केला, बाकी सर्वांनी स्वीकार केला. आनंदला बाकी साऱ्या गोष्टींचे ज्ञान होते, त्याने पाठ केला, लोकांनी स्वीकार केला. ही खूप मोठी गोष्ट झाली! त्या काळात कोणती प्रिंटिंग प्रेस तर नव्हतीच, कागदही नव्हते. इतके विशाल साहित्य, थोडे-थोडके नाही. याला लोक स्मरणच तर करतील. नाहीतर कोणी म्हणेल- नाही, मला असे आठवत आहे; कोणी म्हणेल असे..., तर बिघडून जाईल सारेच्या सारे. ऑथेंटिक काय आहे? प्रामाणिक काय आहे? असे आपण एकत्र मिळून निश्चित करू की “भगवानांची ही प्रामाणिक वाणी आहे. यात कोणी आपल्या बाजूने काही जोडू नये, यातून काही काढू नये.” ही पहिली संगीती झाली जिने धर्माला जीवित ठेवले. याच्यानंतर तर ही परंपरा सुरूच झाली. मग दुसरी संगीती झाली, तिसरी झाली, चौथी संगीती श्रीलंकेत झाली, मग पाचवी झाली, आणि आता सहावी संगीती भगवान बुद्धांच्या 2500 वर्षांनंतर बर्मामध्ये झाली. या वेळी जी बुद्धवाणी, जे त्रिपिटक पाली भाषेत जगातील पाच देशांमध्येच होते- बर्मा, श्रीलंका, थायलंड, कंबोडिया आणि

लाओसमध्ये— तिथल्या 500 विद्वान भिक्षूंना एकत्र केले गेले आणि बुद्धवाणीचे पारायण झाले.

भगवान बुद्धांची सर्वच्या सर्व शिकवण त्यांच्या वेळीही बाहेर गेली, पण साधारण 250-275 वर्षांनंतर जेव्हा अशोक सम्राट झाला आणि त्याचे गुरु "मोग्गलिपुत्त तिस्स थेर" यांनी तिसरे संगायन केले तेव्हा त्याने भारताच्या बाहेर धर्मदूत पाठवले म्हणजे, ठिक-ठिकाणी असे अरहंत पाठवले ज्यांना संपूर्ण वाणी कंठस्थ होती आणि त्याच्याबरोबरच हे विपश्यना ज्ञान, ही विद्या जागो-जागी पाठवली गेली तेव्हा श्रीलंका आणि बर्मातही गेली. भारताचे मोठे दुर्भाग्य झाले 500 वर्षे होता-होता आपसातील भांडणांमुळे आणि काही इतर कारणांमुळेही ही विद्या इथून लुप्त झाली- विपश्यनाही आणि वाणीही. आम्ही खूप उपकार मानत आहोत - "सम्राट अशोक" आणि "मोग्गलिपुत्त तिस्स थेर" यांचे; जर त्यांनी ही विद्या बाहेर पाठवली नसती तर ही कायमची नष्ट झाली असती. आम्हाला कशी मिळाली असती? हिचा लाभ जगात कोणाला मिळाला नसता. ज्या पाच देशांनी वाणीला कायम ठेवले, ते सर्व एकत्र होतात. सर्वांचे उच्चारण भिन्न-भिन्न परंतु पाली तीच आहे. सर्वांची लिपी भिन्न-भिन्न पण किरकोळ फरक; कुठे छोट्या "इ" ची मात्रा किंवा मोठ्या "ई" ची मात्रा. अशी छोटी-मोठी भिन्नता परंतु असे नाही की मूळ वाणीत परिवर्तन येईल. इतक्या वर्षांपर्यंत सांभाळून ठेवले की ऑथेंटिक झाली. याच्याने हा विश्वास वाटतो की खरोखर ही बुद्धवाणी आहे. यांनी सांभाळून ठेवली नसती तर आपल्याला कशी प्राप्त झाली असती? ही विपश्यना विद्याही सर्व ठिकाणी गेली परंतु नष्ट झाली, बर्माने सांभाळून ठेवली म्हणून त्यांचे उपकार मानत आहोत.

आपल्या इथे आणि बाहेरही अशी मान्यता आहे, किंवा कुणा संताने भविष्यवाणी केली होती की हे जे रत्न बर्मा (सुवर्णभूमी) ला पाठवले जात आहे, (बर्मामध्ये खूप सोने असायचे म्हणून त्याला सुवर्णभूमी म्हणत असत), तेच (सोने) या अनमोल रत्नाला सांभाळून ठेवेल. बाकी साऱ्या देशांमधून नष्ट होऊन जाईल. 2500 वर्षे पूर्ण झाल्यावर ही विद्या, हे रत्न पुन्हा आपल्या उद्गम देशात, म्हणजे, भारत देशात येईल. तिथले लोक मोठ्या प्रसन्नतेने याला स्वीकारतील, तिथे स्थापित होईल, पुन्हा साऱ्या विश्वात पसरेल. साऱ्या विश्वाचे लोक याला स्वीकारतील.

ही वाणी आणि विद्या अशा प्रकारे का ठेवली गेली, याचे एक कारण आहे. वृद्ध भिक्षू "सभुद्र" ज्याने ही घोषणा केली होती की चांगले झाले, तो मरण पावला.. जर तो असे म्हटला नसता तर कदाचित कोणी विचारही केला नसता की या वाणीला कायम ठेवले पाहिजे नाहीतर अशा प्रकारचे लोक बिघडवून टाकतील. तर त्याचेही उपकार मानतो, चांगले केले त्याने. खूप मोठी घटना घडली. आणि सर्वात मोठी गोष्ट ही की याच्यानंतर कशा प्रकारे लोकांनी भले 500 वर्षेच, पण हिला सांभाळून ठेवले.

आमच्यासमोर प्रमाण आहे या गोष्टीचे की या विद्येने देशाला किती मोठा लाभ झाला. कित्येकांचे कल्याण झाले. सम्राट अशोक एका शिलालेखात लिहितो- माझ्याआधी किती राजे झाले, किती सम्राट झाले जे सर्व इच्छित होते की आमच्या प्रजेत धर्म जागो. लोक खूप शांतीचे जीवन जगोत, धर्माचे जीवन जगोत, मोठ्यांचा सन्मान करोत, लहानांवर प्रेम करोत, खूप दान देण्याची भावना जागो इत्यादी.., परंतु कोणता राजा सफल नाही झाला. इच्छित तर सर्वच होते, कोणी सफल झाले नाही. पुन्हा म्हणतो- मी सफल झालो. खोटे नाही बोलत. खोटे बोलला असता तर त्याचा शिलालेख तोडून फेकून दिला असता लोकांनी. इतक्या वर्षांपर्यंत कायम राहिला ना! म्हणूनच म्हणतो मी सफल झालो. का सफल झाला? एक तर त्याने धर्मामात्य नियुक्त केले. अमात्य म्हणजे मंत्री; धर्माचे मंत्री म्हणजे धर्म शिकवणारे लोक; राज्याकडून धर्म शिकवणारे लोक ठिक-ठिकाणी जाऊन धर्म शिकवतात आणि हे पाहतात की लोकांना समजत आहे की नाही? त्यांना धर्म पालन करण्यात काय अडचण आहे? एक तर हे कारण झाले; पुन्हा म्हणतो— अरे, हे तर खूप छोटेसे कारण होते. या उपदेशांनी कोण बदलेल? थोडा वेळ बदलेल, पुन्हा जसाचा तसा. माझ्या सफलतेचे मूळ कारण हे की मी लोकांना ध्यान करणे शिकवले, विपश्यना करणे शिकवले. आश्चर्य आहे, करोडोंच्या आबादीचा देश. कशी ही विद्या पसरवली गेली? कशी विद्या शिकवली गेली?

आता पुन्हा वेळ आली, कोणता ना कोणता रस्ता असा निघेल की ही विद्या साऱ्या देशात पसरेल आणि खूप मोठे कल्याण होईल. तर आमच्यासाठी खूप मोठ्या प्रेरणेची गोष्ट झाली की ही विद्या कायम आहे. विपश्यनाही कायम आहे आणि वाणीही. साऱ्या ब्रह्मदेशात नाही परंतु खूप थोड्याशा लोकांनी गुरुशिष्य परंपरेने कायम ठेवले. बाकी साऱ्या संसारात लोकचक्र असेच चालू असते. ज्या थोड्याशा लोकांनी सांभाळून ठेवले त्यांचे मोठे उपकार मानतो. या स्थानाचे मोठे महत्व की या महापुरुषाने इथे इतक्या दीर्घ-यात्रेचा अंत केला— "नत्थिदानि पुनब्भवोति"- आता माझा पुनर्जन्म होणार नाही. आणि इतके मोठे काम केले की करोडो लोकांचे कल्याण होत चालले आहे, होतच राहील. या अर्थाने या स्थानाचे खूप मोठे महत्व आहे.

ज्या धर्म-विरोधी शक्ती असे इच्छितात की धर्म पुढे वाढू नये त्यांच्या प्रमुखाला "मार" म्हटले जाते. जेव्हा हे सम्यक संबुद्ध बनले तेव्हा याने खूप प्रयत्न केला की हे संबुद्ध बनू नयेत. त्याची अशी इच्छा आहे की लोकांनी याच चक्रात पडून रहावे. खूप झाले तर देवलोकात जावे, अरे तिथे असा आनंद आहे, असा आनंद... लोक त्यातच पडून राहोत. हे-हे करा, तुम्हाला देवलोक मिळेल. लोकांनी त्यातच खुश रहावे. कोणाला त्याच्यात खुशी वाटत नसेल तर असे ध्यान करा की ब्रह्मलोक मिळेल. तो याच चक्रात लोकांना अडकवून ठेवू इच्छितो. कोणी साऱ्या लोकांच्या पलीकडे निघून जाईल, जिथून पुनर्जन्म होणार नाही, हे त्याला पसंत नाही. म्हणून जसेही ते सम्यक संबुद्ध बनले तेव्हा येऊन म्हणतो की आपण मुक्त झालात, आता सोडा या जंजाळाला. लोकांना शिकवण्याची गोष्ट कशाला करत आहात? अरे, नाही, मी यासाठी सम्यक संबुद्ध बनलो नाही. ते शिकवत गेले, शिकवत गेले. पुन्हा एकदा येऊन म्हणतो- आता तर खूप लोक शिकले आहेत, आपले खूप शिष्य बनले आहेत, आता तरी परिनिर्वाण घ्या. भगवान म्हणतात नाही, आमचे चार प्रकारचे संघ आहेत- भिक्षु-संघ, भिक्षुणी-संघ आणि गृहस्थांमध्ये उपासक-संघ, उपासिका-संघ. जेव्हा हे चारीच्या चारी संघ, ना केवळ स्वतः धर्मात परिपुष्ट होतील, तर चारीच्या चारी- जेव्हा लोकांना धर्म शिकविण्याच्या लायक होतील, आणि मला खात्री होईल की हे चारीच्या चारी धर्म शिकवत आहेत तेव्हा परिनिर्वाण घेईन. तेव्हा वैशालीत परिनिर्वाणाच्या तीन महिने आधी तो पुन्हा येतो—आता तर महाराज! पुष्कळ लोक तयार झालेत ना आपले. बरेच भिक्षूही तयार झालेत जे स्वतःही पक्व झाले, लोकांनाही शिकवू शकत आहेत. पुष्कळ भिक्षुणी, गृहस्थ-उपासक-उपासिका, इतरांना शिकवू शकतात. तेव्हा त्यांनी म्हटले, हो ठीक आहे आणि त्यांनी भविष्यवाणी केली की तीन महिन्यांनंतर जी वैशाख पौर्णिमा येत आहे, ती रात्र समाप्त झाल्यावर मी आपले शरीर त्यागेन.

याच्याने एक गोष्ट स्पष्ट झाली की चारीच्या चारी संघ पक्व झाले होते. ही दुर्भाग्याची गोष्ट झाली की काही काळानंतर जे गृहस्थ होते त्यांनी कोणते व्रत केले, थोडेसे ध्यान केले आणि त्यातच लागून गेले तेव्हा गृहस्थ आचार्य खूप कमी होऊन गेले. परंतु आपले मोठे दादा गुरुजी—"लैडी सयाडो" की जे मोठे दूरदर्शी होते, त्यांनी पाहिले की 100-125 वर्षांनंतर भगवान बुद्धांची 2500 वर्षे पूर्ण होतील, तेव्हा ही विद्या भारतात जाईल आणि भारतात स्थापित झाल्यानंतर साऱ्या विश्वात पसरेल. ते भारतात आले, इथली स्थिती पाहिली तेव्हा एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली की आज भारताची ही अवस्था आहे की जर कोणी भिक्षू तिथे जाऊन बुद्धांची विद्या शिकवेल तर ते म्हणतील- अरे, हा तर बौद्ध धर्म आहे. लोकांच्या मनात एक वेडेपण स्वार आहे की हा बौद्ध धर्म आमच्या कामाचा नाही. कोणी ऐकणारच नाही, पालन करणे तर खूप दूर. त्या दूरदर्शी भिक्षूने पाहिले की कोणी गृहस्थ जाईल तर काम बनून जाईल. त्यानंतर वेळ येईल की सर्व शिकवू लागतील पण आधी कोणी गृहस्थाने जावे. परंतु गृहस्थांमध्ये अजूनपर्यंत कोणी आचार्य बनलेले नाही. मला गृहस्थ आचार्य तयार करायचे आहेत. मोठे उपकार मानतो की त्यांनी गृहस्थांकरीता दरवाजा उघडला की तुम्हीही विपश्यना शिका. लोक विपश्यना शिकू लागले. खूप थोड्या लोकांमधून एक असे आदर्श गृहस्थ आचार्य झाले—"सया तै जी",

ज्यांनी एक आदर्श स्थापित केला की जे गृहस्थ आचार्य होतील, ते कसे असतील? कसे जीवन असेल? आणि त्यांचे शिष्य झाले माझे धर्म-पिता "सयाजी ऊ बा खिन", जे इतके मोठे संत.

तेव्हा ही परंपरा गृहस्थांची झाल्यामुळे भारताने ही विद्या स्वीकारली. याचा अर्थ हा नाही की भिक्षू लोक शिकवूच शकत नाहीत. भारतातील लोकांची अशी मानसिकता आहे, त्यांच्यात इतक्या भ्रांती आहेत ज्यांची शिकार मी स्वतःही झालो. परंतु 31 वर्षांच्या वयात जेव्हा ही विद्या मला मिळाली तेव्हा पाहिले की याच्यात काही खोटच नाही. ही तर इतकी निर्दोष, निष्कलंक आणि कल्याणकारी आहे तर मग आपल्या इथे याच्याविरुद्ध दुनियाभराच्या बाष्कळ गोष्टी का होतात? त्यांच्या वाणीचे अध्ययन केले तर पाहिले, भाऊ! एक तर अजाणतेने किंवा आपसातील भांडणांना घेऊन निरर्थक गोष्टी पसरवल्या गेल्या, ज्यांचे काही औचित्यच नाही.

आपल्या इथे एक म्हण आहे - वाढवत-वाढवत- तिळाचा ताड करून टाकला, राईचा पर्वत केला. मी पाहिले अरे, इथे तर कोणता तिळही नाही, ताड कुठून झाला? इथे तर राईही नाही, पर्वत कुठून झाला? तर भाऊ! आपले दुर्भाग्य झाले की इतकी वर्षे आपण याच्यापासून वंचित राहिलो. चांगले झाले की विद्या पुन्हा आली आहे, लोकांनी स्वीकार केली आहे. जे लोक येऊ शकत नाहीत, त्यांच्या भ्रांती दूर होवोत. लोकांनी शील-सदाचाराचे पालन करणे शिकावे, त्यात खोट काय आहे? संसाराची कोणती अशी धर्म-परंपरा नाही जी शील-सदाचाराचा विरोध करेल. हे तर शील-सदाचाराचे पालन करणे शिकवतात आणि त्याचे पालन करण्यासाठी मनाला वश करणे शिकवतात. कोण विरोध करेल? आणि मनाला वश करण्यासाठी जे आलंबन आहे ते श्वासाचे आहे. जे सर्वांकरीता एकसारखे आहे. प्रत्येक जण त्याचा अभ्यास करू शकतो. आणि केवळ मनाला वशच करायचे नाही तर मनाला मुळांपर्यंत निर्मळ करायचे आहे. असे करण्यासाठी प्रज्ञा शिकवतात. शरीर आणि चित्ताच्या पारस्परिक संबंधांमुळे कशा प्रकारे संवेदनांच्या आधारावर विकार जागतात, आणि कशा प्रकारे काढले जाऊ शकतात याचा सर्वजण स्वीकार करतात. हिंदू असो, मुस्लीम असो..., भारतीय असो, पाकिस्तानी असो..., काही फरक पडत नाही. मनुष्य-मनुष्य आहे, सर्वांचा स्वभाव एकसारखा असतो. कसे आपल्या स्वभावाला पालटावे आणि चांगले जीवन जगू लागावे - सर्व स्वीकार करतात. या तीन गोष्टींना सोडून त्या माणसाने आणखी काही शिकवले नाही. परंतु त्यांच्या माथी न जाणे किती गोष्टी थापून दिल्या, ज्यामुळे देश दोन हजार वर्षांपर्यंत या विद्येच्या लाभापासून वंचित राहिला. आता हळूहळू लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे. त्या चुकिला लोक स्वीकार करीत आहेत, खूप चांगली गोष्ट आहे. इथेच तो 'सुभद्र' ज्याच्या मनात ही इच्छा जागली की भगवानांकडून ही विद्या शिकावी. त्याचे स्वतःचे कल्याण झाले. परंतु दुसरा तो 'सुभद्र' जो म्हणतो की चांगले झाले, वृद्ध मरण पावला, आता आम्ही बंधन-मुक्त झालो आहोत, जे हवे ते करू. त्याच्यामुळे ही सारी विद्या जतन करून ठेवली गेली- परियत्तीही, पटिपत्तीही म्हणजे वाणीही आणि विपश्यनाही. दोन्ही कायम राहिल्या आणि आमचे खूप मोठे कल्याण झाले. या अर्थाने या स्थानाचे आपले एक खूप मोठे महत्व आहे. इथे ध्यान करून आपण आपले मंगल साधूयात!

कल्याणमित्र, सत्यनारायण गोयंका

(सहायक आचार्य नियुक्ती इत्यादी पुढील अंकात)

## दोहे धर्माचे

सन्मुख दीपंकर उभे, जे सम्यक संबुद्ध।
मिळे विमल च विपश्यना, होय मुक्त अन् शुद्ध॥
एकटाच रे मी तरू, हा तर अनुचित स्वार्थ।
इतरांना तारल्याविन, साधे न परमार्थ॥
सहजी प्राप्त मुक्ती पण, त्याग तिचा च कर।
अजून पारमी जोडून, भाग्य रे, बुद्ध च बन॥
आहेत या संसारी, किती प्राणी च दीन।
त्यांची बंधने पण तुटे, होवो च दुःख क्षीण॥

## दूहा धरम रा

चालता धर्म पथावर, चित्त विमल जर होय।
तर सम्यक संबुद्धाची, खरी वंदना होय॥
हीच बुद्धांची वंदना, हाची बुद्ध सन्मान।
प्रज्ञा करुणा प्रेमाने, भरती तन मन प्राण॥
संबुद्ध तुझ्या बोधीचा, कसा च मंगळ घोष।
झोपलेल्यांना जाग रे, मदहोशांना होश॥
बोधी रे महिमामयी, माती सोने होय।
होई खडा तर हिरा च, धोंडा पारस होय॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2570, 15 जून, 2026, वर्ष 2, अंक 4

वार्षिक सदस्यता शुल्क ₹ 100.00, (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50,) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026 **प्रति अंक शुल्क ₹ 0.00**

Posting day-**15th of every month** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 10 June, 2026, DATE OF PUBLICATION: 15 June, 2026**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
**धम्मगिरी, इगतपुरी - 422 403**
**जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत**
**फोन :** (02553) 244998, 244076, 244086, 244144, 244440 मोबा. 9405618869
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org